साकेतांक क्र 1991061922

क्र. कॉन/ए.डो. १४/क-१/१९९१
पुणे, दिनांक १२-६-१९९१.

विषय :- जमिन एकत्रीकरण योजना

डोंगरी विभागांतील एकत्रीकरण योजनेचे काम बंद करण्याबाबत....

**प रि प त्र क**

शासनाकडील महसूल व वन विभाग क्रमांक एकत्री/१०९०/६७३०/ल-१, दिनांक ७-५-१९९१ चे पत्राने यापुढे डोंगराळ भागात जमिन एकत्रीकरण योजना अंमलात आणू नये अशा सूचना दिल्या आहेत. [प्रत सोबत जोडली आहे.] शासनाकडील नियोजन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक डोंविका-१०८९/प्र. ६६/योजना-१९, दिनांक २३ नोव्हेंबर १९९० यांतील आदेशांत डोंगरी विभागांत मोडणारे तालुके / गांवे निश्चित करण्यांत आले आहेत. त्या शासन निर्णयाची प्रत यासोबत जोडली आहे. डोंगरी विभागांतील एकत्रीकरण योजनेचे काम न करण्याबाबत शासन आदेशाचे पालन करण्यासाठी खालील प्रमाणे सूचना देण्यांत येत आहेत.

[१] शासन निर्णय दिनांक २३-११-९० च्या लगत परिशिष्ट १ व २ यांत नमूद केलेल्या तालुक्यांत / गावांत एकत्रीकरणाचे काम येथून पुढे सुरु करण्याचे नाही.

[२] वरील ठरावांत जे तालुके डोंगरी विभाग म्हणून जाहिर केले आहेत. व त्या तालुक्यांत जे सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी एकत्रीकरणाचे काम करीत आहेत त्यांनी त्यांचेकडील शिल्लक असलेले [१] अधिकार अभिलेख [२] नकाशा छपाई [३] हस्तांतरण प्रमाणपत्रे [४] दशमान आकारबंद या प्रकारांतील शिल्की अनुसरण काम हाती घेऊन ते पूर्ण करावे.

[३] ग्राम नकाशा अद्ययावतीकरणाचे काम चालू वर्षी १००% पूर्ण करावे.

नं. कुमार
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख [म.राज्य] पुणे.

प्रत :- सर्व उपसंचालक भूमि अभिलेख / एकत्रीकरण अधिकारी / अधिक्षक भूमि अभिलेख आणि एकत्रीकरण अधिकारी / विशेष अधिक्षक भूमि अभिलेख आणि एकत्रीकरण अधिकारी / सहायक एकत्रीकरण अधिकारी / जिल्हा निरिक्षक भूमि अभिलेख यांचेकडेस माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

S-76

(८८)

महाराष्ट्र शासन

क्र. एकत्री-१०९०/६७३०/ल-१
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक २७ मे १९९१.

प्रति,

कक्ष अधिकारी,
लोक आयुक्त यांचे कार्यालय,
नवीन प्रशासकीय भवन,
१ला मजला, मादाम कामा रोड,
मुंबई - ४०० ०३२.

विषय :- डोंगरी भागात एकत्रीकरण योजना बंद करणेबाबत.

आपले वरील विषयासंबंधीचे क्रमांक उलेआ/आमि/१९०४/८९, [आरसीपी], दिनांक ३० मार्च १९९१ चे पत्र कृपया पहावे.

२/- आपणास कळविण्यात येते की, एकत्रीकरण योजना डोंगराळ भागापुरती बंद करण्याबाबत जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना जरुर त्या सूचना देण्यात आल्या आहेत. सबब ही बाब मा. लोकआयुक्त यांचे निदर्शनास आणण्यात यावी अशी विनंती.

सही/-xxx

[ रा. ना. चिन्मुळगुंद ]
सह सचिव, महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग.

प्रत :-

१] जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२] सहाय्यक जमाबंदी आयुक्त [एकत्रीकरण] पुणे.

त्यांना कळविण्यात येते की, यापुढे डोंगराळ भागात जमीन एकत्रीकरण योजना अंमलात आणू नये. त्याप्रमाणे सर्व संबंधीतांना सूचना तात्काळ देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करावा.

S-75